ISSN 2319-8648

# Current Global Reviewer

International Research Journal Registered & Recognized Higher Education For All Subjects & All Languages

Editor In Chief

Arun B. Godam

// Current Global Reviewer

ISSN 2319-8648

International Research Journals Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

Editor in Chief
Mr. Arun B. Godam

**Editorial Office :**

Khadgaon Road, Kapil Nagar, Latur, Dist. Latur 413512 (M.S.) India.

**Contact :-**

Arun B. Godam

8149668999, 8483959442

**E-mail :**

hitechresearch11@gmail.com.

Shaurya Publication,
Latur

Price : Rs. 250/-

**EXECUTIVE EDITORS**

**Dr. Hanumant Mane**
R.Guide & Head, Dept. of Marathi,
Shivchatrapati College,
Kalam, Dist. Osmanabad(M.S.)

**Dr. U.T. Gaikwad**
Dept. of Geography,
Smt. S. D. M. College
Latur, Dist. Latur (M.S.)

**Pro. S.B. Karande**
Dept. of Economics,
Shri Bhausaheb Vartak College,
Borivali (W), Dist. Mumbai.

**Dr. N.J. Waghmare**
Res. Guide & Head, Dept. of Pali,
Govt. Sanatketar College,
Shivani, (M.P.)

**Dr U.V.Panchal**
H.O.D, Dept of Commerce,
Deogiri College,
Aurangabad, Dist. Aurangabad

**Dr M.U. Yusuf**
Assistant Professor,
Dept of Commerce,
Sir Sayyed College,
Auranbadad, Dist. Aurangabad

**DEPUTY-EDITORS**

**B.J. Hirve**
Dept. of botany
Vasant Mahavidyalaya,
Kaij, Dist. Beed. (M.S.)

**Maimanat Jahan Ara**
Head, Dept of Political Science,
Sir Sayyed College,
Aurangabad, Dist. Aurangabad

**S.M. Bansode**
Dept. of Sociology,
Shri Shiv Shahu Mahavidalaya,
Sarud, Tq. Shahuwadi, Dist. Kolhapur

**Dr. B.T. Lahane**
Principal, Head, Dept. of English,
Sambhajirao Kendre College,
Jalkot, Dist. Latur (M.S.)

www.rjournals.co.in

CURRENT GLOBAL REVIEWER ISSN - 2319- 8648
Half yearly Research Journal
Vol. I Issue VI, May 2015 to Oct. 2015


# INDEX


| Sr. No. | Title of Research Paper | Author | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Indian and British Metaphysical Poetry Kabir and John Donne. A Study | Dr.N.B.Acharya | 6-13 |
| 2 | Tragic Nature Of Partition Fiction | Khadke R. R.<br>Dr. Bharati Khaimar | 14-18 |
| 3 | Santiago As A Real Hero In Hemingway's The Old Man & The Sea | Bhamare Ravindra Ganpat.,<br>Dr. Bharati S. Khaimar. | 19-25 |
| 4 | A Cultural Study of Basavakalyan Taluk | Basawaraj M. Khandale | 26-32 |
| 5 | Historical Literature Of Bidar District | Vidyavan Ramchandra | 33-38 |
| 6 | Problems of Scheduled Castes in India | Budhabharat Shankarrao Shende | 39-42 |
| 7 | Women Political Participation and Panchayatraj Institutions A Historical Perspective | Ashok G. Holkar | 43-50 |
| 8 | Morphological studies on Europium Selenide thin films | U. S. Chonde,<br>M. M. Betkar | 51-54 |
| 9 | Health scenario in Indian Society | Prof. R.G. Kumawat | 55-62 |
| 10 | Indian Foreign policy: A Brief Study | Prof. Gaikwad Rajesh Kachru | 63-68 |
| 11 | नाटक 'कोर्टमार्शल' शोषण से भरी कहानी का अंत | आलसिंग बाबूराव चव्हाण | 69-72 |
| 12 | धूमिल के काव्य में चित्रित सामाजिक संघर्ष : | नागनाथ संभाजी वारले | 73-75 |
| 13 | स्वदेश दीपक के साहित्य में देशप्रेम | मठपती नागय्या करबसय्या | 76-79 |
| 14 | "भारतीय राजकीय पक्षांच्या उदयाची पार्श्वभूमी" | डॉ. रत्नाकर बाबुराव लक्षटे | 80-84 |

# "भारतीय राजकीय पक्षांच्या उदयाची पार्श्वभूमी"

डॉ. रत्नाकर बाबुराव लक्षटे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
देगलुर महाविद्यालय, देगलुर, ता. देगलुर, जि. नांदेड.

14

Research Paper - Political Science

**प्रस्तावना :-**

'राजकीय पक्ष आणि लोकशाही' या दोन्ही बाबी आज जगातील प्रत्येक देशांच्या राजकारणात महत्वपुर्ण स्थानावर आहेत. कारण राजकीय पक्षामुळेच लोकशाहीला एक प्रकारचे बळ मिळते. त्यामुळे राजकीय पक्षाच्या स्पर्धेविना लोकशाहीची कल्पना करता येत नाही, एव्हाना आधुनिक काळातील कोणत्याही देशाचे तेथील स्थानिक, प्रादेशिक अथवा राष्ट्रीय राजकारण हे पुर्णत: राजकीय पक्षांवर अवलंबून असते. किंबहूना कोणतीही राजकीय व्यवस्था असो की, शासन पध्दती असो तेथे राजकीय पक्ष आवश्यक असतातच. एकंदरीत विचार करता राजकीय पक्षाविना लोकशाहीची कल्पना करता येणे शक्य नाही. विशेष म्हणजे आधुनिक शासन व्यवस्था ही प्रतिनिधीक स्वरुपाची झालेली असून याला भारतीय राजकीय व्यवस्था सुध्दा अपवाद नाही. तात्पर्य हाच आहे की, राजकीय पक्ष आणि लोकशाही हे एकाचा नाण्याच्या दोन बाजू आहेत.[1] अशा या आधुनिक काळातील राजकीय पक्षांची सुरवात १८ व्या शतकात इंग्लडमध्ये झाली. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात इंग्लडमधील राजकीय पक्ष पध्दतीचे अनुकरण जगातील इतर देशांप्रमाणे भारतानेही केले आहे.२ एकंदरीत विचार करता जगातील बहुतांश देश हे राजकीय पक्षांबाबत इंग्लडचे अनुकरण केले असले तरीही भारतीय राजकीय पक्ष पध्दतीला खुप मोठा इतिहास आहे. कारण भारतातील राजकीय पक्ष पध्दतीची सुरुवात ही स्वातंत्र्य पुर्व काळापासून झालेली आहे. त्यामुळे येथील कांही राजकीय पक्षांना स्वातंत्र्याचे संदर्भ जोडले जातात. सबब अशा सर्व बाबीचे विश्लेषन करताना प्रस्तूत शोध निबंधासाठी पुढील प्रमाणे संशोधन आराखड्याचा विचार केला आहे.

**संशोधनाचे समर्थन :-** प्रस्तुत शोध निबंधात भारतातील पक्ष पध्दतीच्या पार्श्वभूमीच्या अध्ययनाचे समर्थन करण्यात आले आहे.

ISSN - 2319- 8648
Vol I Issue VI, May. 2015 to Oct. 2015

**संशोधनाची व्याप्ती (Scope of the study) :-** प्रस्तुत शोध निबंधात स्वातंत्र्यपुर्व काळापासून ते भारताच्या स्वातंत्र्यानंतर निर्माण झालेल्या राजकीय पक्षांचा ओझरता आढावा घेतला आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये (Objects of Research) :-**

१) भारतीय राजकीय पक्ष पध्दतीचे अध्ययन करणे.

२) भारतीय राजकीय पक्षांच्या जडणघडणीची तपशिलवर माहिती घेणे.

**संशोधनाची समस्या (Research Problem) :-**

स्वातंत्र्य पुर्व काळात भारतीय पक्ष पध्दती सह विविध राजकीय समस्यांचे अध्ययन करणे.

**गृहतिके (Hypothesis) :-**

१. स्वातंत्र्यपूर्व काळापासून भारतात राजकीय पक्षांची निर्मिती झाली आहे.

२. भारतीय स्वातंत्र्य संग्रामात कॉंग्रेसची भूमिका महत्वपूर्ण राहिली.

३. भारतांने संसदीय शासन पध्दतीबरोबर लोकशाहीचा स्वीकार केला.

४. भारतात राष्ट्रीय आणि प्रादेशिक पक्ष आहेत.

**तथ्य संकलन (Data Collection) :-** प्रस्तूत शोध निबंधासाठी प्रलेखीय साधनांचा वापर करण्यात आला असून शक्य तो प्रकाशित साधनावर भर दिला आहे.

**अभ्यासाची पध्दती :-** प्रस्तूत शोध निबंधासाठी ग्रंथालयीन अभ्यास पध्दती प्रमाण मानुन गरजेनूसार ऐतिहासिक, विश्लेषनात्मक अभ्यास पध्दतीचा स्वीकार करण्यात आला आहे.

उपरोक्त प्रमाणे प्रस्तूत शोध निबंधासाठी संशोधकांने संशोधन आराखड्याचा विचार केला असून विषयाच्या अनुषंगाने पुढील बाबींवर विश्लेपन केले आहे.

कोणत्याही शासन व्यवस्थेत राजकीय पक्ष आवश्यक असतात. लोकशाहीला गतीमान करणारे माध्यम म्हणून राजकीय पक्षांचा उल्लेख केला जातो. एकंदरीत लोकशाही राज्य व्यवस्थेचा तो एक अनिवार्य असा भाग आहे.३ लोकशाही शासन व्यवस्थेत लोकप्रतिनिधींच्या हातात सत्ता असते. लोकप्रतिनिधींची निवड ही प्रौढ मतदान पध्दतीने होते. ज्या राजकीय पक्षांचे बहुसंख्य उमेदवार निवडणूकीत यशस्वी होतात. त्या पक्षाच्या हाती शासन संस्थेची सुत्रे कांही काळापर्यंत राहातात. यासाठी सत्ता ताब्यात घेण्या करिता निवडणूकीचा अवलंब करणे, घटनात्मक वैद्य मार्गाने आपले धोरण नागरिकांना पटवून शासन सत्ता ताब्यात घेणे हा राजकीय पक्षांचा निश्चित

हेतू असतो.४तसेच राजकीयपक्षांची राजकारणातील भूमिका अत्यंत महत्वाची असते. जनतेच्या मागण्या आणि अपेक्षा ह्या सुसंघटीत करण्याचा ते प्रयत्न करतात. स्वातंत्र्यानंतर भारताने तर संसदीय शासन प्रणाली स्वीकारली असल्यामुळे अशा शासन व्यवस्थेत सत्ताधारी राजकीय पक्षाप्रमाणे विरोधी पक्षाला सुध्दा महत्वाचे स्थान असते. एकंदरीत बहूमत प्राप्त पक्ष राज्यकारभाराची सुत्रे सांभाळतो तर विरोधी पक्ष हे राज्य कारभारावर नियंत्रण ठेवतो. राजकीय विचारवंतानी राजकीय पक्षाचा अर्थ सुध्दा वेगवेगळ्या पध्दतीने स्पष्ट केला असून या बाबत विविध विचारवंतानी आपली मते स्पष्ट केली आहेत. तरी पण राजकीय पक्ष ही समान विचारसरणी, कार्यक्रम, उद्दिष्ट्ये व ध्येय असणारी राजकीय संघटना अथवा संस्था आहे, असे मत अनेकांनी व्यक्त केले आहे.५

भारतातील राजकीय पक्ष/उदयाची पार्श्वभूमी :- भारतातील राजकीय पक्षांच्या निर्मितीला स्वातंत्र्याचा संदर्भ आहे. असे म्हंटल्यास फारसे वावगे ठरणार नाही. कारण भारतात राजकीय पक्ष पध्दतीची सुरुवात स्वातंत्र्यपुर्व काळात झालेली होती. त्याचे उत्तम उदाहारण म्हणजे १८८५ मध्ये स्थापन झालेली 'भारतीय राष्ट्रीय काँग्रेस' होय. परंतु भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेआधी सुध्दा भारतात वेगवेगळ्या भागात विविध राजकीय संस्था स्थापन झाल्या होत्या. या संस्थानी राष्ट्र जागृतीचे काम सुरु केले होते.६ द बॉम्बे असोसिएशन, पुणे सार्वजनिक सभा ही त्याची उत्तम उदाहरणे आहेत. परंतु राष्ट्रीय व्यासपीठावर मात्र तत्कालीन काळात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने आपला वेगळा ठसा निर्माण केला. कारण बऱ्याच दिवसा पासून भारतीयांना अखिल भारतीय पातळीवरची आणि राष्ट्रीय स्वरुपाची एखादी संघटना आवश्यक वाटू लागली होत्या. विशेषत: यातच ब्रिटिशांच्या विरोधात राष्ट्रजागृती होऊ लागली. किंबहूना राजकीय प्रश्नांची चर्चा करण्यासाठी जात,धर्म,भाषा विसरुन सर्व लोकांनी एकत्र येण्याची गरज व्यक्त केली जाऊ लागली.७ परिणामी असे एक व्यासपीठ असावे की, ज्यावर कोणत्याही एका वर्गाची, धर्माची मक्तेदारी नसेल, या संकल्पनेतूनच राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना करण्यात आली.

भातीय स्वातंत्र्य लढ्याचे नेतृत्व करणारा पक्ष म्हणून तत्कालीन काळात भारतीय राष्ट्रीय काँग्रेस हा पक्ष नावारुपास आला. श्री ए.ओ. हयूम यांना काँग्रेसच्या स्थापनेचे श्रेय दिले जाते. तेच काँग्रेसचे जनक म्हणून ओळखले जातात. ब्रिटिश राजवटीत कांही सुधारणा व्हाव्यात असे त्यांचे मत होते. ए.ओ. हयूम हे उदारमतवादी हिंदी जनतेविषयी प्रेम असणारे सनदी अधिकारी होते. म्हणूनच हयूमने भारताच्या प्रमुख प्रांतामध्ये जे तत्कालीन नेते होते. त्यांच्याशी अनुषंगाने चर्चा

ISSN - 2319- 8648
Vol I Issue VI, May. 2015 to Oct . 2015

केली. तसेच व्हाइसरॉय डफरीनशी चर्चा केली. किंवहूना ब्रिटिश पार्लमेंटची या योजनेला संमती मिळविली.८ १८८४ मध्ये हयूम ने 'इंडियन नॅशनल युनियन' ची स्थापना केलेल्या संघटनेचे 'इंडियन नॅशनल कॉंग्रेस' असे नामकरण करण्यात आले. अशा या भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे पहिले अधिवेशन गोकुळदास तेजपाल संसकृत कॉलेज, मुंबई येथे भरले. या पहिल्या आधिवेशनाचे अध्यक्षस्थान बॅ-उमेशचंद्र बॅनर्जी यांनी स्विकारले. या पहिल्या अधिवेशनाला देशाच्या निरनिराळ्या भागातून ७२ प्रतिनिधी उपस्थीत होते.९ अशायाकॉंग्रेसच्या स्थापने मागील ब्रिटिशांच्या सहकार्याबाबत वेगवेगळे मतप्रवाह असले तरीही स्वतंत्र्याच्या दृष्टिकोणातून तत्कालीन काळात भारतीय लोकांना एक राष्ट्रीय व्यासपीठ मात्र कॉंग्रेसने निर्माण केले. ज्यामुळे भविष्यातील स्वातंत्र्य आंदोलनाबाबत कॉंग्रेसची भूमिका अत्यंत महत्त्वाची राहिली. अशा या कॉंग्रेसमध्ये स्वातंत्र्य प्राप्ती अशा एकमेव ध्येयासाठी सर्व स्तरातील लोक या संघटनेत सामील झाले. पुढे थोड्याच दिवसात जहाल आणि मवाळ असे दोन गट कॉंग्रेस मध्ये पडले. विशेषत: राष्ट्रीय चळवळ दुबळी करण्यासाठी ब्रिटिशांनी कधी हिंदुना कधी मुस्लीमांना जवळ करणे या भेदनीतीचा अवंलब केला.१० परिणामी १९०६ मध्ये मुस्लीम लिग तर १९०७ मध्ये हिंदु महासभेची स्थापना झाली. वैचारिक मतभेदावरुन येथेच अनेक पक्ष पध्दतीची भारतात सुरुवात झाली. १९४७ ला भारताला स्वतंत्र प्राप्त झाले. स्वतंत्र भारताने लिखीत संविधान, लोकशाही, संसदीय शासन प्रणाली बरोबर बहूपक्ष पध्दती स्वीकारली.राष्ट्रीय स्तरावर कॉंग्रेस, भाजप, माकप, भाकप, जनता दल, समाजवादी पार्टी ही त्याची उदाहरणे आहेत. या शिवाय भारतात प्रादेशिक आणि राष्ट्रीय स्तरावरील असे दोन प्रकारचे पक्ष आहेत. भारताच्या स्वतंत्र्य प्राप्तीनंतर महात्मा गांधीच्या मनात राष्ट्रीय कॉंग्रेसचे विसर्जन करण्याची कल्पना होती, परंतु स्वतंत्र्योत्तर काळात राज्याची धुरा सांभाळण्यासाठी राष्ट्रीय चळवळीचा वारसा लाभलेला कॉंग्रेस पक्ष असावा असे कॉंग्रेसच्या अनेक नेत्यांना वाटत होते. त्यामुळे पुढे तो पक्ष टिकून राहिला व सत्तारुढ झाला.११ विशेषत: स्वातंत्र्यापूर्वीच भारतात अनेक पक्षांची स्थापना झाली होती. या शिवाय स्वातंत्र्यानंतर प्रत्येक घटक राज्यात प्रादेशिक पक्ष स्थापन झाले असून विविध राज्यात त्यांची सरकारेही स्थापन झाली आहेत.

**सारांश :-**

शोध निबंधाच्या अनुषंगाने भारतातील राजकीय पक्षाच्या उदयाला स्वातंत्र्याची प्रेरणा होती. तसेच राष्ट्रीय व्यासपीठाची ही तत्कालीन काळात प्रचंड गरज होती. या गरजेतून भारतात

राजकीय पक्षांची मर्हूतमेढ रोवली गेली. पुढे वेगवेगळ्या वैचारिक मतभिन्नतेनुसार अनेक पक्ष/बहूपक्ष निर्माण झाले.

## संदर्भ सूची

१. प्रा. घांगरेकर/कवठाळकर (१९९६), भारतीय राजकीय व्यवस्था, दत्त सन्स, नागपुर, पृ. ३११.

२. प्रा. बापट प्र.ग. (१९७२), भारतीय संविधान, श्री प्रकाशन, नागपूर, पृ. १३८.

३. प्रा. बोराळकर, जोशी, चोपडे (जून १९८९), भारतीय राजकीय व्यवस्था, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर पृ. ८९.

४. प्रा. बापट प्र.ग. पुर्वोक्त पृ. ४.

५. प्रा. लोटे रा.ज. (१९९५), भारतीय संविधान आणि राजकारण, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर पृ. १३८.

६. प्रा. डॉ. भोसले जालिंदर, (जुलै २००७), आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, पायल पब्लिकेशन पुणे, पृ. ६७.

७. प्रा. डॉ. भोसले जालिंदर, पुर्वोक्त पृ. ६८.

८. प्रा. मोरे, नवथर, काळभोर, (२००९), आधुनिक भारत, अथर्व प्रकाशन, पुणे, पृ. ३९.

९. प्रा. मोरे, नवथर, काळभोर, पुर्वोक्त पृ. ४०.

१०. डॉ. इंगोले व्ही.एन., एरंडे व्ही.एल., (१९९८), भारतीय शासन आणि राजकारण, कल्पना प्रकाशन, नांदेड, पृ. २३६.

११. नवलगुंदकर श.ना., (जूले २००१), राज्यशास्त्र, अनमोल प्रकाशन, पुणे पृ. १५७.